# सृजनरंग

अंक – १०

जुलै २०२५



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक – १०

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल,** (भा.प्र.से.)
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **मा. राहूल रेखावार,** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे,**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : –
  उपसंचालक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **प्रदीपकुमार कुडाळकर,**
  सहायक संचालक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **ममता पवार**
  उपविभागप्रमुख, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. अजयकुमार फुंदे**
  अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुनीता काटम,**
  विषय सहायक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष.
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार,**
  अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग.
  **राणी पाटील**
  अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.
  **संदीप वाकचौरे,**
  उपशिक्षक, जि. प. प्राथ. शाळा कोंची, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर तथा राज्य अभ्यासगट सदस्य.
  **सुवर्णा पवार,**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथ. शाळा आर्वी, ता. हवेली, जि. पुणे तथा राज्य अभ्यासगट सदस्य.
  **वैशाली शेवाळे,**
  विषय साधनव्यक्ती URC, औंध मनपा.
  **पूजा जाधव,**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथमिक शाळा गिरीम, ता. दौंड, जि. पुणे.
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे.)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे.)
- **अंक १०** : जुलै, २०२५
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.




# सृजनरंग

अंक – १०

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## प्रस्तावना

**शिक्षक बंधुभगिनींनो,**

सृजनरंगचा दहावा अंक आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. शिक्षणप्रक्रिया ही अधिक अधिक समाजभिमुख असली पाहिजे, शिक्षण म्हणजे पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम पूर्ण करणे नाही, तर आपल्या अवतीभवती असलेला समाज, माणसे यांना जाणून घेणे हा देखील अभ्यासाचा भाग असतो. समाजाच्याप्रति शाळेचे दायित्व आहे, पण समाजाचेसुद्‌धा दायित्व आहे की, शाळा अधिक समृद्ध व्हायला हव्यात आणि त्यासाठी सातत्याने मदतीचा हात द्यायला हवा. विकासाची प्रक्रिया आणि तिची फळे आपल्याला अधिक उत्तम चाखायची असतील, तर शाळांमधून विद्यार्थी घडवले जायला हवेत. आजच्या विद्यार्थ्यांमधून उद्याचा उत्तम नागरिक उभा राहत असतो. हे नागरिक जितके उत्तम घडतील तितका उत्तम समाज विकसित होईल आणि समाज उत्तम निर्माण झाला की, लोकशाही व्यवस्था अधिक समृद्ध होण्यास मदत होणार आहे. त्या दृष्टीने शाळा आणि गाव यांचे संबंध अधिक दृढ असायला हवेत. शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग जितका सक्रियतेने होईल, तितक्या मोठ्या प्रमाणावर शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यास मदत होणार आहे. शिक्षणासाठीचे अध्ययन अनुभव समाजाशी एकरूप झाल्यानंतर ज्या स्वरूपात मिळतात त्यामुळे अध्ययनप्रक्रिया अधिक समृद्ध होण्यास मदत होत असते. शाळांच्या विकासासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत आहेत, मात्र तरीसुद्‌धा लोक सहभागाने शाळांचे चित्र अधिक वेगाने बदलू शकते हे या अंकातील अनेक लेखांनी दर्शित केले आहे. शिक्षकांनी मनावर घेतले, तर गुणवत्ता उंचावते हे खरेच; पण शाळेचे रूपडेदेखील बदलू शकते हे वास्तव समोर आले आहे. शाळा आणि शिक्षक यांचे असणारे नाते जितके घट्ट आहेत तितकेच नाते समाजासोबत जोडले गेले, तर समाज शाळेच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावरती मदरीचा हात देत असतो. शेवटी शाळा हे समाजाचेच प्रतिबिंब आहे. शाळा समाज विकासाचे केंद्र आहे. त्यामुळे समाजाच्या उन्नतीसाठी शाळा अधिक समृद्ध असायला हव्यात यात शंका नाही. मात्र त्यांच्या विकासाच्या प्रक्रियेत सरकारसोबत स्थानिक नागरिक सक्रिय झाले, तर आपल्याला अधिक वेगाने परिवर्तनाची वाट चालणे शक्य आहे.

या अंकामध्ये अनेक शिक्षकांनी शाळा परिवर्तनाच्या भूमिकेत लोकसहभागाने विकास कसा करता आला हे समजून घेता आले आहे. शिक्षकांनी आणि गावकऱ्यांनी एकत्रित येऊन शाळांचा बदलला चेहरा मोहरा. यामुळे वाढलेल्या विद्यार्थ्यांचा पट हे सारे सकारात्मक बदलाच्या दिशेचे पाऊल आहे. समाजाला गुणवत्तेची आवश्यकता आहे. जिथे गुणवत्ता मिळते तिथे विद्यार्थी व पालक येतात. नव्या युगाचा शब्द गुणवत्ता असणार आहेत. त्या दृष्टीने या शाळांनी घेतलेले उपक्रम आणि पालकांना अपेक्षित असलेली गुणवत्ता यातून शाळा बदलत असल्याचे चित्र उभे राहिले आहे. या शाळांच्या यशोगाथा वाचून अनेक शिक्षकांना प्रेरणा मिळू शकते. ती प्रेरणा घेऊन शिक्षकांनी पुन्हा एकदा नव्या जोमाने शाळा परिवर्तनासाठी पावले टाकण्याची गरज आहे. शाळा जितक्या उत्तम उभ्या राहतील तितक्या वेगाने सामाजिक, आर्थिक परिवर्तन होणार आहे. म्हणूनच शाळांच्या विकासाला अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षक समर्पणाच्या वृत्तीने काम करतील अशी अपेक्षा आहे. ज्यांनी काम केले त्याचे प्रतिबिंब या अंकात उमटले आहे. अशा नव्या दिशेने झेप घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन. आपण या अंकासाठी लेखन केले त्याबद्दल सर्व लेखकांचे देखील आभार.

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
**संचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



Runa Graphics / 1 Com E/ 2025 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

# अनुक्रमणिका

◈ **शिक्षकांचे प्रयत्न आणि लोकसहभागातून गुणवत्तेची वाट** १
जि. प. उच्च प्राथमिक आदर्श शाळा, धनज, ता. उमरखेड, जि. यवतमाळ.

◈ **गावकऱ्यांच्या एकतेतून घडलेली शैक्षणिक क्रांती** ४
जि. प. प्राथ. शाळा, राक्षसभुवन (तांबा), ता. शिरूर कासार, जि. बीड.

◈ **चालता गुणवत्तेची वाट** ७
जि. प. प्राथ. शाळा, ता. रेणुकानगर, जि. अहिल्यानगर.

◈ **शाळा बोलकी झाली** ९
जि. प. वरिष्ठ प्राथमिक उर्दू केंद्रीय शाळा, आसेगाव ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

◈ **संवादातून परिवर्तनाकडे** ११
राज्यस्तरीय मॉडेल स्कूल, जि. प. शाळा नेवरी, ता. कडेगाव, जि. सांगली.

◈ **आणि गुणवत्तेची वाट सापडली** १३
जि. प. शाळा, काळीधोंड, ता. जव्हार, जि. पालघर.

◈ **'मिशन बर्थडे' उपक्रमातून शाळेचा विकास** १८
जि. प. प्राथ. शाळा, बेल्हे नंबर–१.

◈ **लोकसहभागातून विकासाकडे** २०
जि. प. उच्च प्राथ. शाळा, आष्टा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.

◈ **लोकसहभागातून भौतिक संपन्नता** २३
जि. प. आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, बोरगव्हाण, ता. पाथरी, जि. परभणी.

◈ **सृजनाच्या नव्या वाटा** २६
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जि. प. आदर्श प्राथ. शाळा,
सावरगाव डुकरे, ता. चिखली, जि. बुलढाणा.



Runa Graphics / 1 Com E/ 2025 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

# शिक्षकांचे प्रयत्न आणि लोकसहभागातून गुणवत्तेची वाट

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा धनज, केंद्र मुळवा, ता. उमरखेड, जि. यवतमाळ या शाळेतील अनुभवी शिक्षकांनी स्वतः पुढाकार घेऊन शाळेचे रूप पालटण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. कमी वेळेत गुणवत्तेत उत्तुंग भरारी घेत भौतिक सुविधेत शाळेला अद्ययावत केले आहे.




शाळेला विस्तृत आवार आहे, पण त्याची म्हणावी तशी निगा राखली जात नव्हती. वर्गखोल्या असणाऱ्या इमारतीचा परिसर सोडल्यास इतर जागेत गवत, कचऱ्याचे ढीग, उंच, सखल अशी असमान जागा अशी अवस्था होती. बदलीने आलेल्या शिक्षकांनी शाळेचे आवार पाहून या आवाराचा उपयोग चांगल्या प्रकारे करण्याचे ठरवले. शालेय गुणवत्ताही जेमतेम होती. तालुक्यापासून २८ ते ३० किलोमीटर अंतरावर शाळा असल्याने शाळेकडे दुर्लक्ष होत होते, परंतु उमरखेड पंचायत समितीचे नव्यानेच रुजू झालेल्या गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून पंचायत समिती उमरखेड येथे मिशन अक्षर वाचन व लेखन व १००% शाळा भेट हा उपक्रम सुरू झाला. या उपक्रमांतर्गत प्रत्येक शाळेची गुणवत्ता व भौतिक सुविधा तपासण्याचे काम सुरू झाले. त्यात तालुक्यातील सर्व शाळांचा समावेश होता. याचाच फायदा घेत येथील शिक्षकांनी गुणवत्तेवर व शालेय भौतिक सुविधांवर लक्ष देण्याचे ठरवले. सर्व शिक्षकांनी मिळून विविध उपक्रम राबविल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता तर सुधारलीच त्यासोबतच पालकांना जागृत करून शाळा व्यवस्थापन समिती व लोकसहभागातून भरीव असा निधी जमा करून शाळेचे रूप पालटण्यास सुरुवात केली.

गुणवत्तेमध्ये धनज शाळा केंद्रात शेवटच्या रांगेत होती. परंतु शिक्षकांच्या मेहनतीने व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळचे अधिव्याख्याता आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रेरणेने धनज शाळेने केंद्रातून द्वितीय क्रमांक पटकावत स्वतःला सिद्ध केले. त्याचबरोबर शिक्षकांनी स्वतः पदरमोड करून प्रत्येकी २००० रुपये जमा करून शाळेचे कुंपण, शालेय परिसराचे सुशोभीकरण, रंगरंगोटी, भौतिक सुविधांसाठीचे नियोजन केले. त्याचबरोबर 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हा उपक्रम सुरू झाल्याने शाळेने त्यातही सहभाग नोंदविण्याची ठरवले. या सहभागाला व शिक्षकांच्या मेहनतीला प्रतिसाद देत शाळा व्यवस्थापन समितीतील



Runa Graphics / I Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

सदस्यांनीही प्रत्येकी रु. २००० जमा करत शाळेला आर्थिक हातभार लावला, ग्रामस्थांनीही श्रमदान करत लोकसहभाग दिला.

## क्रीडा स्पर्धेतील उल्लेखनीय यश :



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा धनज शाळेने गुणवत्तेसोबतच क्रीडास्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सलग तीन वर्षे केंद्रस्तरीय सर्वसाधारण जेतेपद प्राप्त केले आहे. यावर्षी तब्बल वीस क्रीडाप्रकारांपैकी अठरा क्रीडाप्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तालुकास्तरावर दोन प्रकारांमध्ये जेतेपद मिळवले. कब बुलबुलमध्ये प्रथमच भाग घेत उल्लेखनीय कामगिरी करत विविध पारितोषिके मिळविली आहेत.

## वाढदिवसाचा खर्च शाळेसाठी :

यासोबतच शिक्षकांनी स्वतःचे वाढदिवस व स्वतःच्या मुलांचे वाढदिवस घरी साजरे न करता शाळेसाठी गरजेच्या असणाऱ्या वस्तू भेट देऊन वाढदिवस साजरे केले.

## सांस्कृतिक कार्यक्रमातून मदत :

शालेय सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनीही भरभरून प्रतिसाद देत २०२३–२४ या वर्षी नऊ हजार तर २०२४–२५ यावर्षी तब्बल २७ हजार रुपयांची भरघोस बक्षिसांची उधळण करत शालेय विकासास हातभार लावला. या सर्वांचा परिपाक असा झाला की शाळेची पटसंख्या, शिक्षकांची तळमळ, ग्रामस्थांचे सहकार्य या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनानेही शाळेचा मॉडेल स्कूल म्हणून प्रस्ताव मंजूर केला. त्यातून नवीन प्रशस्त इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सोबतच प्रयोगशाळा, क्रीडांगणाचे सपाटीकरण, जंगल थीम पार्क अशा विविध गोष्टी शाळेला उपलब्ध होऊ लागल्या. आता तर शिक्षकांवर लोकांचा विश्वास एवढा वाढला की ज्या शाळेतील अनेक विद्यार्थी आई–वडिलांच्या कामासाठीच्या स्थलांतरामुळे दाखला घेऊन आश्रमशाळेत जायचे, त्याच शाळेमध्ये यावर्षी तब्बल वयानुरूप २४ प्रवेश विविध वर्गात होत आहेत. २४ पैकी १५ विद्यार्थी हे खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून आलेले आहेत. हे सर्व शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे फळ आहे. विद्यार्थ्यांना विविध टास्क देणे, ते त्यांच्याकडून पूर्ण करून घेणे व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्म ानचिन्ह, प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य या गोष्टी देऊन प्रोत्साहित करणे यामुळे शालेय गुणवत्तेत अतिशय चांगली भर पडली आहे. शिक्षकांचे प्रयत्न व लोकसहभागातून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा धनज ही अद्ययावत होत आहे. भविष्यामध्ये ही शाळा इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. शाळेचे स्वतःचे यूट्यूब चॅनल असून विविध सांस्कृतिक व सहशालेय उपक्रमांचे व्हिडिओ त्यावर प्रसिद्ध होतात. सोबतच



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम सतत राबवले जातात. त्यामध्ये 'आव्हानांच्या दुनियेत', 'स्टार स्टुडन्ट ऑफ द विक', '१००% उपस्थिती उपक्रम', 'स्मायली बॅच', 'पाठांतर स्पर्धा', 'बाल आनंद मेळावा', 'माझी बँक', 'महादीप', 'ज्ञानी मी होणार', 'रंगकर्मी', 'भारत टॅलेंट सर्च' इत्यादी उपक्रम व स्पर्धांचे आयोजन केले जाते. भविष्यात १०० टक्के विद्यार्थी प्रगत असणारी व परिपूर्ण भौतिक सुविधांनी सुसज्ज असणारी शाळा करण्याचा शिक्षकांचा मानस आहे. त्यासाठी ग्रामस्थांचा व पालकांचाही हातभार व मोलाची साथ मिळत आहे.

आमच्या शाळेला मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ; प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ; शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, यवतमाळ; शिक्षणाधिकारी योजना, जिल्हा परिषद, यवतमाळ; गटविकास अधिकारी पं. स. उमरखेड या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची सदैव प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले आहे. शाळेच्या उत्तम वाटचालीसाठी प्रयत्न करणारे शाळेचे मुख्याध्यापक आणि होतकरू शिक्षकवृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य आणि समस्त ग्रामस्थ यांचे शाळेला मिळालेल्या बहुमोल योगदानातूनच शाळेचे रूप अंतर्बाह्य पालटले आहे.

**शाळेचे पालटलेले रूप**






**गजानन देवकते**

जि. प. उच्च प्राथ. आदर्श शाळा धनज केंद्र मुळवा,

ता. उमरखेड, जि. यवतमाळ



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

# गावकऱ्यांच्या एकतेतून घडलेली शैक्षणिक क्रांती

जिथे गावकऱ्यांचा सहभाग असतो, तिथे शाळेचा विकास केवळ सरकारी मदतीवर अवलंबून राहत नाही, तर ती एक सामाजिक चळवळ होते. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राक्षसभुवन (तांबा), ता. शिरूर कासार, जि. बीड ही होय. आज शिक्षण, संस्कार, तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि सौंदर्यीकरण या सर्व क्षेत्रांत ग्रामीण भागात ही शाळा आदर्शवत ठरत आहे. गावकऱ्यांची निःस्वार्थ भावना, शाळेतील सर्व शिक्षकांचे सातत्यपूर्ण समर्पण व अथक परिश्रम, जोडीला सामाजिक संस्थांची मदत आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबेजोगाई यांचे मोलाचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचे अपार कष्ट यांमुळे शाळेत शैक्षणिक क्रांतीच घडत आहे. या सर्वांमुळे गाव, शाळा आणि विकास यांचे नाते अधिक घट्ट झाले.

पूर्वी शाळा म्हणजे फक्त एक शैक्षणिक केंद्र होते, पण राक्षसभुवन (तांबा) येथील ग्रामस्थांनी शाळेकडे केवळ शिक्षण देणारी संस्था म्हणून न पाहता, तिच्याकडे गावाच्या उज्ज्वल भविष्याचा पाया म्हणून पाहिले. शाळेतील भौतिक सोयी, आधुनिक तंत्रज्ञान, स्वच्छ परिसर आणि संस्कारक्षम वातावरण यासाठी त्यांनी एकत्र येऊन योगदान दिले. या संपूर्ण प्रक्रियेत शाळेतील शिक्षकांनी नेतृत्व घेतले, गावकऱ्यांशी सतत संवाद साधला, नियोजन केलं आणि सर्व बदल यशस्वीपणे अंमलात आणले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, आंबेजोगाई, बीड यांचे मार्गदर्शन व शैक्षणिक दृष्टिकोन यामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास व कृतीशीलता अधिक वृद्धिंगत झाली. यामुळे शाळेच्या विकासाचा प्रवास एका सामूहिक चळवळीत परिवर्तित झाला. शाळेमध्ये विविध सुविधांच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे बदल झाले आहेत.

### शिवजयंती विशेष दिनी ब्लूटूथ स्पीकर भेट –

शिवजयंती २०२३ मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने तयारी करत, शिवकालीन गाण्यावर अत्यंत आकर्षक लेजीम सादरीकरण सादर केले. संपूर्ण गावाने विद्यार्थ्यांच्या सांघिक प्रयत्नाचे कौतुक केले. त्यांच्यातील आत्मविश्वास, सांस्कृतिक जाणीव, आणि सादरी करणातील ताकद पाहून गावकरी भारावून गेले. याच कार्यक्रमात प्रेरणा घेऊन राजमुद्रा ग्रुप, राक्षसभुवन (तांबा) या युवक संस्थेने शाळेला स्पीकर भेट दिला. आज हा स्पीकर शाळेतील प्रार्थना, घोषवाक्य, सूचना, ध्वनिशिक्षण आणि सांस्कृतिक उपक्रमांत अत्यंत उपयुक्त ठरत आहे. हे योगदान म्हणजे केवळ एक साधन नाही, तर शाळेप्रति असलेले गावकऱ्यांचे प्रेम आहे.





Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

## स्वाभिमानाचे प्रवेशद्वार :




शाळेचे प्रवेशद्वार हे केवळ एक फाटक नसते तर ते असते गावाच्या स्वाभिमानाचे आणि आदर भावनेचे प्रतीक. राक्षसभुवन (तांबा) येथील भारत गॅस एजन्सीच्या मालकांनी शाळेस आकर्षक लोखंडी फाटक भेट स्वरूपात दिले. 'स्वागत आहे' असे फाटकावरील शब्द आणि त्याची देखणी रचना शाळेच्या सौंदर्यात भर घालते.

## प्रोजेक्टर :

डिजिटल शिक्षणाच्या वाटचालीत गावकऱ्यांनी दरवर्षी आयोजित होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात सदिच्छेने आर्थिक मदत केली. याच निधीतून शाळेने प्रोजेक्टर खरेदी केला. जो शाळेत अध्यापनात क्रांतिकारक ठरला. आज शिक्षक चित्रफिती, सादरीकरण, ॲनिमेशन, शैक्षणिक व्हिडिओ आदींच्या साहाय्याने आपल्या विषयातील आव्हानात्मक संकल्पना अधिक सुस्पष्ट व रोचक पद्धतीने समजावून देतात. यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासातील रस वाढला आहे. ग्रामीण भागातील मुलांसाठी असा दृक्श्राव्य अनुभव म्हणजे उज्ज्वल भविष्याची वाटचाल आहे.

## पेव्हर ब्लॉक :

पूर्वी पावसाळ्यात शाळेच्या पटांगणात चिखल होऊन मुलांना वर्गात पोहोचणे कठीण व्हायचे आणि परिसर अस्वच्छ व घसरडा वाटायचा. या समस्येमुळे उपक्रम, खेळ आणि शिस्तीच्या हालचालींवर मर्यादा यायच्या. हे पाहून गावकऱ्यांच्या मदतीने शाळा चिखल मुक्त आणि स्वच्छतेच्या दिशेने जावी यासाठी पटांगणात पेव्हर ब्लॉक बसवण्यात आले त्यामुळे आज संपूर्ण परिसर एकदम कोरडा, स्वच्छ व आकर्षक झाला आहे. आज या परिसरात मुले आत्मविश्वासाने खेळतात, संचलन करतात, शाळेतील विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे भाग घेतात.



## लोकसहभाग :

लोकसहभागातील प्रत्येक गोष्ट केवळ देणगी नव्हे, ती एक भावना आहे, एक जबाबदारी आणि एक जिव्हाळा. गावातील विविध स्तरांतील लोक शेतकरी, उद्योजक, शिक्षक, युवक, महिला बचत गट, माजी विद्यार्थी सर्वांनी एकत्र येऊन शाळेच्या



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

गरजा ओळखल्या आणि त्या पूर्ण केल्या. एकत्रित संकल्पातून सामूहिक परिवर्तन शक्य झाले ते शाळेतील शिक्षकांच्या समर्पणामुळे. त्यांनी केवळ अध्यापन नाही केले, तर गावकऱ्यांना एकत्र बांधले, विद्यार्थ्यांना तयार केले आणि शाळेच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. शाळा म्हणजे 'दुसऱ्याची जबाबदारी' असा विचार न करता, 'ही आपली शाळा आहे, तिचा विकास आपल्याच हातात आहे' असा दृष्टिकोन निर्माण झाला.

आजही शाळा शिक्षकांच्या पुढाकाराने विकासाचा वेग वाढत आहे. संपूर्ण गाव ही जबाबदारी आपापल्या परीने पार पाडत आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबेजोगाई, बीड यांनी आपल्या परिणामकारक शैक्षणिक निरीक्षण आणि कार्यशाळांद्वारे सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन करून त्यांना अधिक सर्जनशील आणि प्रयत्नशील बनवले.

आमची शाळा आज गावाच्या संस्कृती, शिक्षणविषयक जागरूकता आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक बनली आहे. इतर शाळांना भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन ठरत आहे. ही शाळा केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही, तर सामाजिक बांधिलकी, स्वच्छता, डिजिटल साक्षरता आणि लोकसहभागाचे शिक्षणही देते. शाळेतील शिक्षक हे या सर्व बदलांचे खरे शिल्पकार आहेत. त्यांचा दृढविश्वास, नवकल्पना आणि सेवाभाव या परिवर्तनाच्या मुळाशी आहेत. इतर गावांसाठी ही शाळा एक प्रकाशस्तंभ ठरू शकते. लोकसहभाग व शिक्षकांच्या नेतृत्वातून शाळा विकसित कशी करता येते आणि शाळेत शैक्षणिक क्रांती घडवता येते याचा प्रचंड आत्मविश्वास शाळेने निर्माण केला आहे हे नक्की.

**गणेश शिंदे**

जि. प. प्राथ. शाळा, राक्षसभुवन (तांबा)

ता. शिरूर कासार, जि. बीड

◈◈◈



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

# चालता गुणवत्तेची वाट

कोणतेही काम यशस्वी करायचे असेल तर त्याकडे आधी सकारात्मक दृष्टीने पाहावे लागते. त्या पाठोपाठ, लागतो तो लोकसहभाग आणि भक्कम पाठिंबा. वाढत्या शैक्षणिक स्पर्धेच्या व खाजगी शाळांच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लोकांचा विश्वास संपादन केला, तर जिल्हा परिषदेच्या शाळांना निश्चित उत्तम पाठबळ मिळेल. आज शालेय गुणवत्तावृद्धीसाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे.

## शालेय विकासासाठी प्रयत्न :




गेल्या काही वर्षांत आमच्या शाळेने विविध पातळ्यांवर विकासाच्या योजना राबवल्या आहेत. सुरुवातीला शाळेतील वर्गखोल्या या पत्र्याच्या होत्या व चार वर्ग स्लॅबचे होते. मुलांना बसण्यासाठी पुरेशी जागा होती परंतु पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. पालिकेकडून पाणीपुरवठा होत होता, परंतु पाणी साठवण्याची सोय नव्हती. आमच्या जिल्हा परिषद शाळेत एम आयडीसीमधील रोजगारावर काम करणाऱ्या कामगारांची मुले असल्याने मुलांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. आमच्या शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या नव्हत्या. त्यामुळे मुले पाणी पिण्यासाठी घरी जात असत व त्यामुळे शालेय कामकाजात, अध्ययन–अध्यापनात व्यत्यय येत असे. आजूबाजूच्या परिसरातील लोक म्हणत, ''मुले सतत फिरताना दिसतात, शाळेला शिस्तच नाही.'' याचा परिणाम गुणवत्तेवर व पटावर दिसू लागला. मग आम्ही सर्व शिक्षकांनी एमआयडीसीमधील कंपन्यांना विनंती करून त्यांच्याकडून पिण्याच्या पाण्याच्या दोन मोठ्या टाक्या उपलब्ध करून घेतल्या. त्यामुळे आपोआपच मुलांची बाहेरची ये–जा बंद झाली व आमची उपस्थिती व गुणवत्ताही वाढली. शिक्षकांच्या प्रयत्नानंतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने'अंतर्गत आमच्या शाळेला सुसज्ज इमारत, स्वच्छतागृह व सुरक्षाभिंत मिळाली. आमच्या विद्यार्थ्यांचे टुमदार प्रशस्त व दिमाखदार शाळेत बसण्याचे स्वप्न आता पूर्ण झाले. पालकांनाही मनोमन माझा मुलगा मोठ्या शाळेत शिकतो; हे स्वप्न आता पूर्ण झाले होते. पण खंत ही होती की संस्थेच्या शाळेतील मुलांसारखे डिजिटल शिक्षण आपल्याही मुलांना मिळावे. मग आम्ही आमची ही खंत काही शिक्षणप्रेमींसमोर व्यक्त केली. सर्व शिक्षकांच्या प्रयत्नातून सुरुवातीला एक व नंतर दोन अशा प्रकारे आज आमच्या शाळेत तीन इंटरएक्टीव्ह बोर्ड आहेत. ज्याच्या माध्यमातून मुले आनंदाने शिक्षण घेत आहेत. मुले स्वतः त्याचा वापर करतात. आनंददायी शिक्षणपद्धतीकडे आमची वाटचाल सुरू आहे. आणखी बरेच भरीव काम करायचे आहे आणि त्यासाठी सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S



शाळेची पटसंख्या २०० पेक्षा जास्त असल्यामुळे परिपाठ जयंती व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करताना शाळेला माईक व स्पीकरची नितांत आवश्यकता भासू लागली. त्यासाठी लोकसहभागातून प्रयत्न सुरू झाले. त्यातूनच एका दात्याच्या पुढाकारातून १४,००० रुपये किमतीची ध्वनियंत्रणा शाळेला मिळाली. स्पष्ट आवाज व संगीताच्या सान्निध्यात परिपाठ घेण्यास मदत झाली व मुलांनाही माईकवर बोलण्याचा, भाषण करण्याचा आनंद घेता आला.

सर्व शिक्षकांचा आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी, सातत्य त्याचबरोबर सकारात्मक विचारांमुळे आम्ही हे काम करीत राहिलो. लोकांचा विश्वास संपादन करून व एक चांगले उद्दिष्ट घेऊन जेव्हा एखादे काम हाती घेतो तेव्हा मदतीचे अनेक हात पुढे येतात. फक्त आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे. थोडक्यात देणारे हजारो हात तयार असतात फक्त घेणाऱ्याची झोळी फाटकी असता कामा नये, चाकोरीच्या बाहेर जाऊन काम करणे आवश्यक आहे.

**पूनम तवले**

जि. प. प्राथ. शाळा रेणुकानगर,

ता. जि. अहिल्यानगर

◈◈◈



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

# शाळा बोलकी झाली

शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा मूलभूत पाया आहे. ग्रामीण भागातील शाळांचे सक्षमीकरण केल्याने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते आणि समाजाच्या विकासाला चालना मिळते. वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील आसेगाव जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत लोकसहभाग तसेच शासकीय निधीच्या मदतीने अनेक विकासाची कामे झाली आहेत. त्यामुळे शाळेचा कायापालट झालेला आहे. सर्वसाधारणपणे ग्रामीण भागातील शाळांमध्ये भौतिक सुविधा अपुऱ्या असतात. आसेगाव शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतने तसेच लोकप्रतिनिधी, पालक आणि माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी विविध सुविधा निर्माण करण्यासाठी सहकार्य केले आहे.

**शासकीय निधीतून झालेली कामे :**

१) **नवीन वर्गखोल्या व फर्निचर :** वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे नवीन वर्गखोल्यांसाठी निधी जमवून त्यांचे बांधकाम करण्यात आले, खुर्ची आणि लेखनासाठी फळ्यांची सोय करण्यात आली. बसण्याकरिता प्लॅस्टिक डेस्क तयार करण्यात आले.

२) **ऑफिस दुरुस्ती :** ऑफिस दुरुस्ती शासनाच्या निधीतून करण्यात आली.

३) **ग्राउंडबेडची निर्मिती :** सदर ग्राउंडबेडचे काम ग्रामपंचायत आसेगाव यांच्यामार्फत करण्यात आले.

**डिजिटल शिक्षणाची सुविधा :**

डिजिटल शिक्षणाचा एक भाग म्हणून शिक्षकांनी स्वतः निधी संकलन करून या वर्गणीतून माईकची व्यवस्था केली व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला.

१) **वर्गात एलसीडी टीव्ही** – एलसीडी टीव्हीची व्यवस्था शिक्षकांनी स्वतः जवळचा निधी संकलन करून या वर्गणीतून टीव्ही खरेदी केला.

२) **स्मार्ट क्लासरूम** – स्मार्ट क्लासरूमसाठी शासनाकडून इंटरऍक्टिव्ह बोर्ड पुरवले गेले आहेत. स्मार्ट क्लासरूम हे बदलत्या काळाची गरज आहे.

३) **शाळा रंगरंगोटी** – माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचा एक नवीन उपक्रम जिल्ह्यात सर्व शिक्षकांनी राबवला आहे. सदर उपक्रमाचे नाव 'बोलक्या शाळा'असून सदर उपक्रमांतर्गत शाळेत रंगरंगोटीची कामे झाली. शालेय इमारत सुंदर, आकर्षक झाली आहे. तसेच



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

आनंददायी शिक्षण देण्याच्या दृष्टीने यासाठी नक्कीच मदत होईल. सदर कामाकरिता दोन लाख निधी हा शिक्षकांनी स्वतः वर्गणी काढून दिला आहे.

**मोहम्मद मुसा**
जि. प. वरिष्ठ प्राथ. उर्दू केंद्रीय शाळा
आसेगाव ता. मंगरूळपीर, जि. वाशिम



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

# संवादातून परिवर्तनाकडे

कडेगाव तालुक्याच्या पूर्वेस येरळा नदीच्या काठावर वसलेले टुमदार गाव म्हणजे नेवरी. गावचा इतिहास पाहिला तर या गावात ऐतिहासिक बारव असून दगडी बांधकाम व त्यातील कलाकुसर काम वाखण्याजोगे आहे. हत्तीला पाणी पिण्यासाठी हत्तीकुंड आहे. इंगवले नावाचे गाव येथे राहत होते पण कालांतराने स्थलांतर झाले.




या गावच्या पश्चिमेकडून येरळा नदी वाहते. गावाला ताकारी योजना, टेंभू योजना या पाण्याच्या योजना फिरल्यामुळे गाव सधन आहे. गावामध्ये ऊस, बागायत व पशुपालन हा व्यवसाय फार मोठ्या जोमात चालतो. शेतकऱ्यांना पैसे मिळवून देतो. त्यामुळे या गावामध्ये दानशूर व्यक्तींची संख्या वाढीस लागलेली आहे. आणि त्यातून दानशूर पुढे येत आहेत. राज्यस्तरीय मॉडेल स्कूल जिल्हा परिषद शाळा, नेवरी कडेगाव तालुक्यातील एकमेव शाळा आहे. या शाळेचे अंतरंग व बाहेरील कामे अतिशय उत्कृष्ट झालेले आहे. शासनाच्या निधीतून जवळजवळ ७० लाखाचे काम पूर्ण झालेले आहे. या कामांमध्ये ग्रामपंचायत सरपंच नेवरी यांनी सुद्‌धा मोठे सहकार्य केले आहे. प्रत्येक वर्गामध्ये साठ इंची एलईडी सीसीटीव्ही फर्निचर सर्व बाबी ग्रामपंचायतने पुरवल्या आहेत. तसेच शासनाकडून प्रयोगशाळा कक्ष, संगणक कक्ष, खेळाचे साहित्य, भरपूर प्रमाणात आलेले आहे. त्यामुळे शाळेचे अंतरंग आणि बाह्य रंग खुलून गेलेले आहे.

राज्यस्तरीय मॉडेल स्कूलमधून झालेली कामे सोडून इतर कामासाठी आम्ही स्थानिक समुदायासोबतच लोक, पालकांकडे गेलो आणि अडीअडचणी त्यांना समजावून सांगितल्या. शाळेची गुणवत्ता वाढण्यासाठी आवश्यक गोष्टींची कल्पना दिली. समाजाचा शाळेविषयी पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. शाळेविषयी लोक कुतूहल आणि प्रेमाने पाहू लागले. त्यातून आम्ही आमच्या अडीअडचणी सांगून शाळेला मदत करण्याचे आव्हान केले. ते आवाहन गावातील दानशूर व्यक्तीने स्वीकारले.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

गावातील एक वारकरी संप्रदायातील कुटुंब अतिशय दानशूर म्हणून ओळखले जाते. श्री चांगदेव शिवाजी महाडिक या व्यक्तीने आम्हाला शाळेच्या पूर्ण गरजा विचारल्या. त्या पूर्ण करण्यासाठी त्यांनी आम्हाला पूर्ण सहकार्य केलं. शाळेमध्ये मुलांना शिकवताना आधुनिक तंत्रज्ञानासह १० व्हाईटबोर्ड दिले. त्यासाठी त्यांनी ४० हजार रुपये खर्च केले त्यानंतर २०२४–२५ साली शालेय विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन पार पडले. यासाठी सर्व मुलांना वीस हजार रुपये भोजनासाठी गावातील गरजू मुलांना शालेय गणवेश दिले. शाळेची गुणवत्ता वाढावी म्हणून भरपूर प्रयत्न केले. असे हे दानशूर व्यक्तिमत्त्व इथेच थांबले नाही तर पुढे, राज्यस्तरीय मॉडेल स्कूलला शोभेल अशा आणि विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या ग्रंथालयाची आवश्यकता होती. आम्ही त्यांना सहज विचारले. त्यांनी होकार दिला. जवळजवळ एक खोली पूर्ण फर्निचर, त्या खोलीमध्ये एक लाख रुपयाची पुस्तके, फर्निचर, मुलांना बसण्यासाठी खुर्च्या दिल्या. त्यासाठी जवळजवळ तीन लाख रुपये खर्च केला. शाळेला सुसज्ज ग्रंथालय तयार करून दिले.

दुसरे देणगीदार सत्यवान पांडुरंग महाडिक. यांनी यावर्षी सर्व मुलांना वह्यांचे वाटप केले. सुशांत भैय्या महाडिक या पालकांनी सुद्धा मुलांना गोड जेवण दिले. वाढदिवसानिमित्त सर्व पालक मुलांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करतात. अशी ही परंपरा नेवरी गावामध्ये पहावयास मिळते. याचाही गुणवत्तेत फरक पडून मुलांमध्ये शाळेविषयी आस्था निर्माण होते.

एक उद्योजक शाळेसाठी लागणारी झाडे पुरवतात. आपल्या मागणीनुसार झाडांची पूर्तता करून देतात व आपला उद्योग पाहण्यासाठी दरवर्षी मुलांना आमंत्रित करतात. त्या ठिकाणी सर्व शिक्षकांचा सत्कार करून मुलांना उत्कृष्ट प्रतीचे जेवण देतात.

अशा प्रकारे शिक्षक व मुख्याध्यापक ध्येयाने प्रेरित होऊन काम करतात. मुलांसाठी अहोरात्र झटतात.

अशा प्रकारे राज्यस्तरीय मॉडेल स्कूल जिल्हा परिषद शाळा नेवरी ग्रामस्थांकडून लोकसहभागातून असणाऱ्या गरजा पूर्ण करून घेतात. मुलांच्या गुणवत्तेकडे लक्ष देतात.

**महाकू ढवळे**

राज्यस्तरीय मॉडेल स्कूल जि. प. शाळा नेवरी,

ता. कडेगाव, जि. सांगली.

◈◈◈



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

# आणि गुणवत्तेची वाट सापडली

विद्यार्थ्यांनी गावातल्या जिल्हा परिषद शाळेतच शिकले पाहिजे, शाळेचा विकास झाला पाहिजे,'' या प्रामाणिक भावनेतून सुरु झालेला प्रवास आज एका आदर्श शाळेत रूपांतरित झाला आहे. ही आहे काळीधोंड गावातील एक प्रेरणादायी कहाणी, जिथे शाळेच्या विकासासाठी संपूर्ण गाव एकत्र आले, श्रमदान केले आणि अपार मेहनतीने एक नवा आदर्श निर्माण केला.

पूर्वी असलेला ठाणे जिल्हा आणि २०१४ पासून तयार झालेल्या नवीन पालघर जिल्ह्याच्या पूर्व भागात वसलेला जव्हार तालुका. हा एक डोंगराळ, दुर्गम व आदिवासी बहुल भाग आहे. जव्हार तालुका निसर्गसंपन्न असला तरी अनेक सामाजिक व शैक्षणिक अडचणींचा सामना करतो. कुपोषणग्रस्तांचे गाव अशी ओळख जव्हार तालुक्याला आहे. जव्हारमध्ये मुख्यतः वारली, काथोडी, कोकणा, कातकरी यांसारख्या आदिवासी जमाती राहतात.

जव्हारमधील अनेक गावे डोंगराळ आणि जंगलात वसलेली तिथे वाहतुकीची साधने, आरोग्य सेवा, वीज आणि आंतरजाल यांचा अभाव आहे. पावसाळ्यात मुख्य गावांपासून काही गावांचा संपर्क पूर्णपणे तुटून जातो.

शिक्षणाच्या दृष्टीने जव्हार तालुक्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. येथे अनेक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कार्यरत असल्या तरी त्या पायाभूत सुविधांअभावी आणि शिक्षकांच्या संख्येअभावी त्या चालवणे कठीण होते. दुर्गम भागातील शाळांमध्ये अनेक वेळा विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी काठावरच्या नद्यांमधून प्रवास करावा लागतो.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी विद्यार्थी १० ते १५ किलोमीटर दूर जाऊन शिक्षण घेतात. मोबाइल, इंटरनेट किंवा डिजिटल साधनांची कमतरता असल्यामुळे ऑनलाइन शिक्षण प्रभावीपणे पोहोचू शकलेले नाही. अनेक वेळा पालकांची उदासीनता, बालविवाह, कुपोषण व हंगामी स्थलांतर यांमुळे मुलांचे शिक्षण अर्धवट राहते.

**डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अग्निपंख प्रयोगशाळा :**

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा काळीधोंड या शाळेने शिक्षणाच्या क्षेत्रात एक आदर्श उपक्रम राबवला आहे. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे वर्ग या शाळेत आहेत. शाळेमध्ये विज्ञान विषयाचे ज्ञान प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे देण्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित शिक्षण मिळत होते.

या अडचणीवर उपाय म्हणून शाळेतील दोन वर्गखोल्यांमधील रिकामी जागा ओळखून, त्या ठिकाणी श्रमदानाच्या माध्यमातून एक नवीन प्रयोगशाळा तयार करण्यात आली. अंदाजे ८०,०००/- रुपयांचे अंदाजपत्रक या वर्गखोली बांधकामासाठी होते. सन २०१६-१७ मध्ये शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि गावकऱ्यांच्या एकत्रित सहभागातून ही प्रयोगशाळा उभी राहिली. यात विज्ञानाचे विविध साहित्य, उपकरणे व शिक्षणासाठी लागणारे साधनसामग्री ठेवण्यात आली.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

या उपक्रमाला प्रेरणादायी स्वरूप देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा या उद्देशाने या प्रयोगशाळेला ''डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अग्निपंख प्रयोगशाळा'' त्यामुळे नाव देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, प्रेरणा आणि आत्मविश्वास वाढतो. आता या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना विज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह शिकवले जाते, ज्यामुळे ते अधिक उत्साहाने आणि समजून घेऊन विज्ञान विषयाकडे पाहू लागले आहेत.

शाळेतील सीमित साधनसंपत्ती असूनही, जाणीवपूर्वक उत्तम नियोजन, शिक्षकांचे समर्पण आणि समुदायाचा सहभाग. यामुळे काळीधोंड शाळेने एक आदर्श उभा केला आहे.

### शाळा स्वच्छता आणि सुविधा उभारणीची सुरुवात

प्रत्येक नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शाळेची स्वच्छता, गळक्या इमारतींवर प्लास्टिक टाकणे, शाळेची डागडुजी करणे, शौचालयांची स्वच्छता, वाढलेले गवत कापणे आणि शाळेला रंग देणे. यांसारखी कामे गावकरी एकत्र येऊन श्रमदानाने करत असत. यामुळे विद्यार्थ्यांना एक स्वच्छ, सुरक्षित आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण मिळू लागले.

### विद्यार्थ्यांच्या गळतीवर नियंत्रण

शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी पालक एकत्र आले. विद्यार्थी कधीकधी घरी सांगतात मी शाळेत जातो, मधूनच कुठेतरी शेतावर माळात रानात जातात पालकांना वाटायचे. आमची मुले शाळेत गेली आहेत पण तो विद्यार्थी त्या दिवशी शाळेत नसायचे. यावर उपाय म्हणून गावकरी एकत्र आले. एकेका पालकावर शाळेत सोडण्याचे जबाबदारी सोपवली. शाळेत येताना पाड्यावरील मुलांसोबत एक पालक नित्य नेमाने विद्यार्थ्यांना शाळेत सोडवायला व शाळा सुटल्यावर घरी घेऊन जायला सोबत येत असे. एक पालक रोज विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जात असे आणि सुटल्यावर घरी आणत असे. शाळेतून काही सूचना पालकांपर्यंत द्यायच्या असतील तर एका पालकामार्फत सर्व पालकांपर्यंत सूचना पोहोचत असे. यामुळे विद्यार्थ्यांचे संरक्षण झाले. एक आदरयुक्त सोबत विद्यार्थ्यांसाठी झाली. गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले व गळतीचे प्रमाणही कमी झाले. यामुळे उपस्थिती वाढली आणि शाळेशी पालकांचा संपर्क अधिक सशक्त झाला. एकीचे उत्तम उदाहरण यावरून पाहावयास मिळते.

### नव्या वर्गखोलीची निर्मिती

शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढल्याने बसण्याची अडचण निर्माण झाली. वर्गखोल्यांची संख्या कमी असल्या कारणाने दोन वर्गातील अंतरात एक छोटी खोली तयार करण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला. साधारणपणे नवीन वर्गखोली तयार करण्यासाठी १,७८,०००/– रुपये अंदाजे खर्च होता. गावकऱ्यांनी एकत्र येऊन श्रमदानाचा निर्णय घेतला. गावकीच्या निधीमधून रेती, विटा, सिमेंट, लोखंड, पत्रे, लादी अशा सर्व साहित्याची व्यवस्था गावकऱ्यांनी केली. दोन वर्गाच्या बाहेरच्या भिंतींना प्लास्टर करणे, नवीन भिंती बांधणे, लादी बसवणे, भिंतींवर लोखंड टाकून पत्रे टाकणे, भिंतींमध्ये फळा तयार करणे, रंग देणे, ग्रीलचा दरवाजा तयार करणे, वर्गात लाईट फिटिंग करणे इत्यादी कामे श्रमदानातून पूर्ण केली. अशा पद्धतीने माझ्या शाळेत



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

एक वर्गखोली तयार करण्यात आली. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी एक नवीन वर्गखोली मिळाली. या क्षणाला पालकांचा शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्यामुळे ही खोली आदर्श वर्गखोली ठरली.



## तांत्रिक शिक्षणाची उभारणी

एवढ्यावर न थांबता जणू काही शाळा विकास हे आमचे ध्येय मनाशी आठवण हा प्रवास पुढे चालू राहिला. डॉन बॉस्को माटुंगा मुंबई संस्थेमार्फत शाळेला १५ संगणक, १ लॅपटॉप व इन्व्हर्टर मिळाले. ही मदत साधारणपणे ८,००,०००/– रुपयांपर्यंत असेल. संगणक ठेवण्यासाठी फर्निचर व वीजजोडणी आवश्यक होती. यासाठी २,७८,०००/– रुपयांची आवश्यकता होती. ही गरज देखील गावकऱ्यांच्या असण्याचे पूर्ण झाली. शाळेसाठी संगणक पक्षाचे स्वप्न पूर्णत्वास आले, पण संगणकाचे ज्ञान असलेले या कार्यक्षम व कुशल शिक्षकाची गरज होती. संगणक शिक्षणासाठी तज्ज्ञ शिक्षकाची नेमणूक गावच्या निधीतून करण्यात आली. अशा प्रकारे संगणक कक्ष उभारण्यात आला. विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान मिळण्याचा मार्ग खुला झाला.



## शौचालयाची सुविधा

मुलांसाठी वॉटरलेस शौचालय उभारण्यासाठी डॉन बॉस्को माटुंगा मुंबई या संस्थेने १,००,०००/– निधी दिला. यामध्ये २ शौचालय, ६ बाथरूम युनिटचे नियोजन होते. निधी अपुरा असल्याने गावकऱ्यांनी उर्वरित कामे श्रमदानातून पूर्ण केली. ही सुविधा मुलांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत उपयुक्त ठरली.

## स्पर्धा परीक्षांमधील यश

जि. प. शाळा, काळीधोंड शाळा ही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व विद्यार्थी स्पर्धात्मक युगात टिकून राहावेत यासाठी विविध उपक्रम घेतले जातात. त्यातून विद्यार्थी व शाळा यांची यशस्वी वाटचाल सुरू आहे.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

## परिक्षेतील यश

राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शिष्यवृत्ती योजना याअंतर्गत गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक १२०००/- याप्रमाणे ४ वर्ष एकूण ४८०००/- शिष्यवृत्ती मिळते.

| शैक्षणिक वर्ष | परिक्षेस बसलेले विद्यार्थी | परिक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी |
|---|---|---|---|
| २०१९-२०२० | २५ | २४ | १९ |
| २०२१-२०२२ | ३६ | २५ | १५ |
| २०२२-२०२३ | ३२ | २५ | १७ |
| २०२३-२०२४ | ३७ | २८ | १८ |
| २०२४-२०२५ | ३८ | २७ | १५ |

त्याचबरोबर नवोदय परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षा व एकलव्य परीक्षा विद्यार्थी देत असतात. त्यातून शाळेला बरेच यश प्राप्त झालेले आहे.

उद्योजकतेचे मानसिकता या उपक्रमाअंतर्गत राज्यस्तरीय विविध उपक्रमांचे सादरीकरण

ऑनलाइन जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन सन- २०२२/२३

ऑनलाइन जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन सन- २०२२/२३ मध्ये जि. प. शाळा, काळीधोंड शाळेचा पालघर जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला आहे.

तालुकास्तरीय पाककला स्पर्धा २०२३-२४ शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक एक २०२३-२४ तालुकास्तरीय प्रथम क्रमांक

अशा पद्धतीने शाळेचा विकास होत आहे.

शाळेचा विकासाची वाटचाल आपणास खालील लिंकद्वारे अनुभवण्यास मिळेल.

https://youtube.com/@liyanborse?si=kiHrnNzfYoz8XTRc

https://youtube.com/@zpskalidhondjawhar1162?si=4JVhd9lD4KAgVzYR

https://youtube.com/@darshanamukane8016?si=-YsaKZpCjRL_NEFw

## शाळेतील परसबाग उपक्रम पौष्टिकतेचा आणि श्रमप्रतिष्ठेचा संगम

माझ्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि त्यांना विविध पौष्टिक अन्नघटक मिळावेत या उद्देशाने एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत शाळेमध्ये परसबाग निर्मिती करण्यात आली.

परसबागेमध्ये डांगर, दुधी, भोपळा, भेंडी, दोडके, कारले, वालाच्या शेंगा, तोंडली यांसारख्या फळभाज्या, तसेच मेथी, पालक, शेपू, खुरसणी यांसारख्या पालेभाज्यांचे लागवड व संगोपन करण्यात आले.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

या सर्व भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनात (शालेय पोषण आहारात) केला जातो, ज्यामुळे मुलांच्या आहारात पौष्टिकतेचा समतोल साधला जातो.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ पोषणपुरवठा नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व वाढवणे हाही आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः शेतीकामात भाग घेऊन, मातीशी नाळ जोडून, आपल्या श्रमातून अन्न निर्माण करण्याचा अनुभव घेतला.

या उपक्रमात शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि गावातील ग्रामस्थ यांनी आनंदाने सहभाग घेतला. त्यामुळे शाळा आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ झाले.

परसबाग उपक्रमाच्या माध्यमातून शाळेने पोषण, शिक्षण आणि श्रमसंस्कार यांचा सुंदर संगम साधला आहे. हा उपक्रम ग्रामीण शिक्षणात सकस आहार व स्वावलंबनाची बीजे रोवणारा एक सकारात्मक प्रयोग आहे.

### यशस्वी परिणाम

सन २०१९ मध्ये १३७ विद्यार्थी असलेली ही शाळा २०२५ मध्ये ३५५ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. शिक्षकांची संख्या वाढली याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली. महाराष्ट्र शासनाने या शाळेचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' उपक्रमात समावेश केला. आज ही शाळा राज्यातील ४८८ आदर्श शाळांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

| अनुक्रमांक | शैक्षणिक वर्ष | पटसंख्या |
|---|---|---|
| १ | २०२०–२१ | १३७ |
| २ | २०२१–२२ | ३१७ |
| ३ | २०२२–२३ | ३३० |
| ४ | २०२३–२४ | ३५० |
| ५ | २०२४–२५ | ३५५ |

या यशामागे शिक्षकांचे अमूल्य योगदान आहे. त्यांनी आपल्या श्रमाने, वेळेने आणि निःस्वार्थ भावनेने ही क्रांती घडवली.

'आम्ही गुणवत्ता निर्माण करतो.' या घोषवाक्याला साजेसा शाळा विकासाचा हा प्रवास आहे. केवळ शासनाच्या योजना नव्हे, तर गावकऱ्यांची इच्छाशक्ती, श्रमदान आणि एकत्रित प्रयत्न यातून खरे शैक्षणिक परिवर्तन शक्य आहे. काळीधोंड येथील शाळेचा हा प्रवास हेच अधोरेखित करतो.

**दर्शना मुकणे**
जिल्हा परिषद शाळा काळीधोंड,
ता. जव्हार, जि. पालघर



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

# 'मिशन बर्थडे' उपक्रमातून शाळेचा विकास

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेल्हे नंबर – १ ही शाळा पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात आहे. बेल्हे बीटमधील सर्वाधिक पटसंख्येची शाळा असून पहिली ते चौथीमध्ये शाळेत २३० विद्यार्थी शिकत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेंतर्गत तालुक्यातून एकमेव आदर्श शाळेमध्ये या शाळेचा समावेश आहे. शाळेच्या भौतिक विकासासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून शाळेत जून २०२३ पासून 'मिशन बर्थडे' हा उपक्रम सुरू करण्यात आला असून, या उपक्रमातून शाळेची समृद्ध शाळेकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे.

खरे म्हटले, तर वाढदिवस हा प्रत्येकाच्या जीवनातील एक आनंदाचा क्षण आणि या दिवशी प्रत्येक जण काहीतरी चांगले करण्याचा संकल्प करत असतो. सध्या समाजमाध्यमांवर शुभेच्छा देणे, केक कापून वाढदिवसाचा आनंदोत्सव साजरा करणे असे सर्वत्र सुरू आहे. या आनंदाच्यादिवशी वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा देऊन शाळेला काही मदत घेता येईल का असा विचार शालेय शिक्षण समितीच्या मनात आला. आणि यामधूनच शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी एकत्र घेऊन शाळेतील छोट्या छोट्या विकास कामांसाठी 'मिशन बर्थडे' या नावाने हा उपक्रम सुरू केला.

समाजमाध्यमांमुळे गावात कोणाचा वाढदिवस आहे हे समजते. 'मिशन बर्थडे' उपक्रमांतर्गत त्यांना फोन करून शालेय व्यवस्थापन समिती सदस्य शुभेच्छा देतात, तसेच शाळेसाठी वाढदिवसाच्या चांगल्या क्षणानिमित्त मदत करण्यासाठी आवाहन केले जाते. आणि शाळेला मदत केल्याबद्दल त्यांना छानसे शुभेच्छा प्रमाणपत्र शाळेच्या वतीने देऊन त्यांचा सन्मान करण्यात येतो. हा सर्व व्यवहार पारदर्शक व्हावा यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व मुख्याध्यापक यांच्या नावे संयुक्त बँकखाते सुरू करण्यात आले. खात्यावरील डिजिटल पद्धतीने व्यवहार व्हावा म्हणून क्यूआर कोड (QR Code) सुविधा सुरू करण्यात आली.

या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेला लोकसहभाग जमा होत आहे. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य यासाठी जोमाने प्रयत्न करत आहेत. स्वतः व कुटुंबातील सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेला सहकार्य करत आहेत. यामुळे शाळेबद्दल आत्मीयता व प्रेम असणारे शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच शाळेशी ज्यांची नाळ जोडलेली आहे असे सर्व सन्माननीय देणगीदार आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने पाचशे, हजार, दोन हजार, पाच हजार अशा स्वरूपाने रोख स्वरूपात तसेच वस्तू रूपाने शाळेला मदत करतात. क्यूआर कोडच्या माध्यमातून देणगीदार शाळेला मदत करत आहेत. या माध्यमातून शाळेला २ लक्ष रुपये रोख रूपाने व १० लक्ष रुपये वस्तू रूपाने लोकसहभाग मिळाला आहे .

या माध्यमातून अगदी बेल्हे गावातील पालक, ग्रामस्थ, पुणे, मुंबई किंवा इतर ठिकाणी परगावी कार्यरत असताना शाळेसाठी मदत करण्याचे मनात आले तर त्याच ठिकाणाहून कोडच्या माध्यमातून पैसे पाठवतात



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

व शाळेला सहकार्य करतात. ‘मिशन बर्थडे’ या उपक्रमाच्या माध्यमातून प्राप्त लोकसहभागातून शालेय व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली शाळेमध्ये अनेक विकास काम होत आहे. अनेक जण शाळेसाठी वस्तू रूपानेही मदत करतात आहे.

‘मिशन बर्थडे’ च्या माध्यमातून प्राप्त लोकसहभागतून शाळेत स्पोकन इंग्रजी हा उपक्रम सुरू करण्यात आला असून, या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेसाठी सुसज्ज कार्यालय, सुसज्ज डिजिटल हॉल, सुसज्ज ग्रंथालय, वाचनालये पुस्तके, घड्याळे, आरसे, फॅन, ट्यूब लाईट, क्रीडा साहित्य अशा अनेक गोष्टींसाठी वस्तुरूपानेही शाळेसाठी देणगीदार सहकार्य करतात.

यामुळे शाळेच्या भौतिक विकासात ‘मिशन बर्थडे’ हा उपक्रम एक महत्त्वाचा उपक्रम ठरत आहे. शाळेला ‘मिशन बर्थडे’च्या माध्यमातून होत असणारी मदत यामुळे खऱ्या अर्थाने शाळेचे रूप बदलत आहे. पिण्याचे शुद्ध पाणी यासाठी, दुरुस्ती, ठिबक संच दुरुस्ती, इलेक्ट्रिक दुरुस्ती अशी किरकोळ दुरुस्तीची कामे चुटकीसरशी मार्गी लागत आहेत. या साठी शाळा व्यवस्थापन समिती, सर्व शिक्षकवृंद सहकार्य करत आहेत.

शाळेला भेट देण्यासाठी अनेक मान्यवर, पालक, ग्रामस्थ येत असतात. या उपक्रमाविषयी माहिती घेतल्यावर उपक्रमाचे कौतुक करतात. सर्व तालुक्यांतून या उपक्रमाचे कौतुक होत असून, तालुक्यातील अनेक शाळांमध्ये हा उपक्रम राबवण्याचे काम एक प्रेरणा म्हणून सुरू झालेले आहे. यामुळे अधिक लोकसहभाग शाळांना मिळत आहे व या माध्यमातून शाळेचा विकासही होत आहे.

‘मिशन बर्थडे’ उपक्रमातून शाळेचा विकास होत असल्याने गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक उपशिक्षक हे सर्व शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत आहेत. ‘मिशन बर्थडे’ या उपक्रमामुळे लोकसहभागातून समृद्ध शाळेकडे शाळेची वाटचाल सुरू झाल्याचे समाधान सर्वांना वाटत आहे.

**संतोष ढुकरे**

जि. प. प्राथ. शाळा बेल्हे नंबर–१

◈◈◈



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

# लोकसहभागातून विकासाकडे

आदर्श शाळा योजनेअंतर्गत शालेय शिक्षण विभागाने निवडलेल्या महाराष्ट्र राज्यातील ३०० शाळांपैकी एक शाळा. ही शाळा निवडताना काही वैशिष्ट्ये व निकष ठरवण्यात आले होते. या सर्व निकषांवर खरी उतरण्याची तयारी असणारी चंद्रपूर जिल्ह्यातील, तालुका भद्रावती येथील ताडोबा जंगलाने व्याप्त, आदिवासी भागातील ही शाळा. जि. प. चंद्रपूर (शिक्षण विभाग) तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर यांच्या सततच्या मार्गदर्शनाखाली विकास करणारी, अखंड प्रयत्नातून फुलणारी, इयत्ता पहिली ते सातवीच्या १५१ बालकांनी गजबजलेली आमची शाळा.

**शाळेतील भौतिक सुविधा :**

- **वर्गखोल्या :** इयत्ता पहिली ते सातवी प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्गखोली अद्ययावत स्वरूपात उपलब्ध आहे. प्रत्येक वर्गात संबंधित इयत्तेनुसार आकर्षक रंगरंगोटी केलेली आहे. विद्यार्थ्यांचे मन वर्गात रमेल तसेच ते बरेचसे ज्ञान भित्तिपत्रकातून अवलोकन करतील अशा सुसज्ज वर्गखोल्या शाळेत उपलब्ध आहेत.
- **क्रीडांगण :** शाळेचे क्रिडांगण खूपच भव्य, आकर्षक आणि प्रशस्त असे आहे. त्या ठिकाणी मुले कबड्डी, खोखो, क्रिकेट यांसारखे बरेचसे खेळ, तसेच विविध व्यायामप्रकार नियमित करतात हे शाळेचे मैदान मुलांच्या शारिरीक विकासासाठी, उत्तम आरोग्य, आनंददायी जीवनासाठी उपयुक्त आहे.
- **क्रीडासाहित्य :** शाळेला विविध योजनेअंतर्गत पुरेशा पटसंख्येनुसार मोठया प्रमाणात क्रीडासाहित्य प्राप्त झालेले आहे. हे सर्व साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था केलेली आहे. विद्यार्थी खेळाच्या तासाला सर्व साहित्यांचा स्वतःच्या आवडीप्रमाणे उपयोग करतात. विविध खेळांत कौशल्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.
- **डिजिटल शाळा व ई – लर्निंग :** शाळेत प्रत्येक वर्गात ॲन्ड्रॉईड टीव्ही उपलब्ध आहे. त्या माध्यमातून प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यास मदत करण्यात येते. तसेच ई–लर्निंग साहित्यातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येते. शाळेत डिजिटल वर्गखोली उपलब्ध आहे. स्मार्ट टिव्ही, प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्णरीत्या शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.
- **संगणक कक्ष :** शाळेत स्वतंत्र संगणक कक्ष उपलब्ध आहेत वर्गवार विद्यार्थ्यांना वेळापत्रकानुसार संगणक हाताळण्याची संधी दिली जाते. संगणकाचे पायाभूत ज्ञान दिले जाते.
- **ग्रंथालय :** विद्यार्थी स्वतः नियोजित आणि संचालित करीत असलेल विविध प्रकारच्या पुस्तकांनी सुसज्ज असे ग्रंथालय उपलब्ध आहे. त्यांची मांडणी वयोगटानुसार विद्यार्थ्यांना सहज निवडता येईल याप्रमाणेच केलेली आहे.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

- **विज्ञानकक्ष :** शाळेला स्वतंत्र असे विज्ञानकक्ष उपलब्ध आहे. त्याठिकाणी भरपूर साहित्य उपलब्ध आहे. दरवर्षी विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येते, त्यातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करण्यास मदत केली जाते.
- **पिण्याचे पाणी :** पिण्याच्या पाण्यासाठी शाळेत स्वतंत्र बोअरवेल आहे. पिण्यासाठी फिल्टरचे पाणी वापरण्यात येत असून आवश्यक तेथे हॅन्डवॉश स्टेशन उपलब्ध आहे.
- **विद्युत सुविधा :** शाळेत प्रत्येक वर्गात विद्युत सुविधा तसेच पंखे उपलब्ध असून त्याचा वापर केला जातो.
- **स्वतंत्र स्वच्छतागृहे :** शाळेत मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध असून त्याठिकाणी स्वच्छता राखली जाते व पाण्याचीसुद्धा सुविधा उपलब्ध आहे.

### गुणवत्ता विकास उपक्रम :

शाळेत वाचन, लेखन, गणन यांचा पाया भक्कम करणारे विविध उपक्रम राबविले जातात. वाचनदिन, श्रुतलेखन, माझे लेखन, वर्गात शैक्षणिक संवाद, विद्यार्थ्यांमधील चर्चासत्र, स्वयंअध्ययन, वर्गमित्र अशाप्रकारे विविध उपक्रम राबविले जातात. या सर्व माध्यमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधला जातो.

### वैविध्यपूर्ण उपक्रम :

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला चालना मळावी यासाठी विज्ञान मेळावा, गणित दिवस, बालआनंद मेळावा, निबंधस्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, खेळस्पर्धा अशा प्रकारे इतर अनेक विविध स्पर्धा आणि उपक्रम घेतले जातात. तसेच निसर्गातील विविध बाबींचा अभ्यास व्हावा यासाठी क्षेत्रभेट, वनभोजन, सहल, वृक्षलागवड यांसारखे उपक्रम घेतले जातात.

सामाजिक सामंजस्य विकास आणि मूल्यशिक्षणासाठी स्थानिक पातळीवरील विविध सण, रक्षाबंधन, दहीहंडी, सर्व महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी शाळेत साजऱ्या केल्या जातात.






### क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा :

शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शाळास्तरावर क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन केले जाते व जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना संधी मिळेल यासाठी प्रयत्न केले जातात.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

**स्पर्धापरीक्षा :**

दरवर्षी नवोदय परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच इतर परीक्षांमध्ये विद्यार्थी सहभागी होत असून त्यांना पुरेसे मार्गदर्शन केले जाते व योग्य तो सराव करून घेतला जातो.

**वाढता लोकसहभाग :**

शाळेच्या विकासासाठी होत असलेल्या विविध उपक्रमात आर्थिक मदत, सहकार्य, श्रमसहकार्य, उपस्थिती मोलाची ठरते यातूनच यशस्वी आणि साकार झालेल्या शाळेतील विविध गोष्टी, उपक्रम, शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी होणारे प्रयत्न शाळेची भौतिक सुविधा विकसित होत आहे. या सर्व विकासप्रक्रियेत शाळा व्यवस्थापन समिती व इतर समित्या तसेच पालकवर्ग यांचा मोलाचा सहभाग आहे.

**शिक्षकवर्ग :**

सर्व वर्गांसाठी असलेले शिक्षक अध्यापनाचे कार्य उत्तमरीत्या पार पाडतात. शाळेतील मुख्याध्यापक आपल्या कामाची जबाबदारी ओळखून आपले काम शिक्षकांच्या सहकार्याने पार पाडतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा प्रकारे साधता येईल याबाबत नेहमीच प्रयत्नशील असतात.

अशा प्रकारे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आष्टा, केंद्र आष्टा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर आदर्श शाळेच्या निकषानुसार समोर येण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**नम्रता त्रिवेदी**
जि. प. उच्च प्राथ. शाळा, आष्टा
केंद्र आष्टा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

# लोकसहभागातून भौतिक संपन्नता

शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा मूलभूत पाया आहे. ग्रामीण भागातील शाळांचे सशक्तीकरण केल्याने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व समाजाच्या विकासास चालना मिळते. बोरगव्हाण (ता. पाथरी, जि. परभणी) येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळेत लोकसहभागाच्या जोरावर अनेक महत्त्वपूर्ण विकास कामे झाली आहेत, त्यामुळे शाळेचा चेहरामोहरा बदलला आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये भौतिक सुविधा अपुऱ्या असतात. बोरगव्हाणच्या व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी, पालक यांनी आणि माजी विद्यार्थ्यांनी मिळून शाळेसाठी विविध सुविधा निर्माण केल्या आहेत.

**लोकसहभागातून झालेली महत्त्वाची कामे :**

**१) भौतिक सुविधा :**

**अ) सभामंडप –** लोकसहभागाच्या माध्यमातून शाळेमध्ये १५ लाख रुपये खर्च करून भव्य सभा मंडप उभारलेला आहे. सभा मंडपाला सुंदर अशी रंगरंगोटी केलेली आहे. त्यावर सुंदर अशी सुवचने लिहिलेली आहेत. या सभा मंडपाचा उपयोग रोजच्या परिपाठाला होतो. शाळेमध्ये होणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, बक्षीस वितरण, भाषणांचे कार्यक्रम यासाठी देखील याचा उपयोग होतो.

**ब) स्वच्छता गृहाची उभारणी –** ग्रामीण भागातील शाळांमध्ये पुरेशी स्वच्छतागृहे नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे आरोग्य, स्वच्छता आणि विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वच्छतागृह उभारणी अत्यंत महत्त्वाची होती. आमच्या शाळेत लोकसहभागाच्या माध्यमातून पाच लाख रुपये खर्च करून मुला-मुलींसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज असे स्वच्छतागृहे उभारण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आरोग्य व स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण मिळाले आहे.

**क) हात धुण्याची व्यवस्था (हॅन्ड वॉश स्टेशन) –** कोरोना काळानंतर हात धुण्याच्या सवयीचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. शाळेत शिकणाऱ्या मुलांना हात धुण्यासाठी स्वच्छ आणि सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. लोकसहभागाच्या माध्यमातून एक लाख रुपये खर्च करून हात धुण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लागण्यास मदत झाली असून, त्यांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास हातभार लागला आहे.

**ड) नवीन वर्गखोल्या व फर्निचर –** वाढत्या विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे नवीन वर्गखोल्यांसाठी निधी जमवून त्यांचे बांधकाम करण्यात आले. तसेच खुर्च्या, बाक, फळ्यांची सोय करण्यात आली.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

लोकसहभागातून जमा झालेले दहा लाख रुपये खर्च करून दोन वर्गखोल्या बांधण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना वर्गात बसण्यासाठी दोन लाख रुपयांचे लाकडी डेस्क तयार करण्यात आले.

**इ) कार्यालय निर्मिती –** शाळेच्या प्रभावी व्यवस्थापन व शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पडण्यासाठी स्वतंत्र कार्यालय असणे आवश्यक होते. लोकसहभागाच्या माध्यमातून कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. यासाठी लोकसहभागातून जमा झालेल्या तीन लक्ष रुपये निधीतून खर्च करण्यात आला. या निधीतून कार्यालयासाठी सोफा, खुर्ची, टेबल तसेच कार्यालयाला रंग देण्यात आला.

**ई) सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले –** शाळांमध्ये सुरक्षितता आणि शिस्त जोपासण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थी, शिक्षक आणि संपूर्ण शालेय व्यवस्थापन अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करत आहे. यासाठी शाळेचे पालक डॉ. गजानन उगले यांनी मोलाची मदत केली.

**फ) ग्राउंड बेडची निर्मिती –** परिपाठ हा शाळेच्या दिनक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक विकासासाठी परिपाठ आवश्यक असतो. ग्रामस्थ आणि पालक यांच्या सहभागातून परिपाठासाठी सुयोग्य ग्राउंड बेड तयार करण्यात आले आहे.

**ग) पुस्तक भेट –** जय वैष्णवी माता एज्युकेशन सोसायटीतर्फे शाळेस एक लाख रुपयांची आठशे पुस्तके भेट मिळाली, तसेच शाळेतील विद्यार्थी आपल्या वाढदिवसाला शाळेला एक पुस्तक भेट देत असतात. 'माझा वाढदिवस, माझी जबाबदारी' या उपक्रमातून जवळपास १०० पुस्तके शाळेस भेट म्हणून मिळाली आहेत.

**२) डिजिटल शिक्षणाची सुविधा :**

**अ) प्रत्येक वर्गात एलईडी टीव्ही –** आमच्या शाळेत सामाजिक दायित्व निधीच्या मदतीने प्रत्येक वर्गात एलईडी टीव्ही बसवण्यात आले आहेत. हा उपक्रम आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण अधिक प्रभावी आणि मनोरंजक बनवण्यासाठी राबवण्यात आला आहे. डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना दृक्श्राव्य साधनांच्या माध्यमातून अधिक चांगल्या पद्धतीने शिकण्याची संधी मिळत आहे. आजच्या युगात डिजिटल शिक्षण अनिवार्य झाले आहे.

**ब) शिक्षकांना शिकवण्यासाठी माईकची व्यवस्था –** आमच्या शाळेत लोकसहभागामधून प्रत्येक शिक्षकांसाठी माईकची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शिक्षकांना मोठ्या आवाजात बोलण्याची गरज राहिली नाही विद्यार्थ्यांना शिकवलेले विषय अधिक स्पष्ट आणि प्रभावीपणे ऐकता येतात.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

**क) एज्युकेशन सॉफ्टवेअर –** शिक्षणाच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करण्यासाठी लोकसहभागातून प्रत्येक वर्गासाठी एज्युकेशनल सॉफ्टवेअर खरेदी केले.

**ड) Smart Classroom ची निर्मिती –** शिक्षणक्षेत्रात डिजिटल क्रांतीमुळे पारंपरिक अध्यापन पद्धतींमध्ये मोठे बदल होत आहेत. स्मार्ट क्लासरूम हे त्या बदलातील एक महत्त्वाचे साधन आहे. विशेषतः माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट क्लासरूमचा उपयोग हा शिक्षण अधिक सुलभ, रोचक आणि प्रभावी बनवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल यांसारखे विषय व्हिज्युअल स्वरूपात दाखवले की विद्यार्थ्यांना समजण्यास सोपे जाते. ॲनिमेशन आणि ग्राफिक्सच्या मदतीने क्लिष्ट संकल्पना सहज शिकता येतात. नववी आणि दहावी या दोन वर्गांमध्ये लोकसहभागातून बसवण्यात आले आहेत. यासाठी पाथरी विधानसभेच्या माजी आमदार साहेबांनी निधी उपलब्ध करून दिला.

**इ) सौर पॅनलची व्यवस्था –** ग्रामीण भागात अनेकदा वीजपुरवठा खंडित होतो त्यामुळे डिजिटल शिक्षणामध्ये अडथळा येतो. या समस्येवर उपाय म्हणून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शाळेमध्ये सौर पॅनलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सौरऊर्जेवर चालणारा विद्युतपंप बसविण्यात आला त्यामुळे शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी २४ तास पाणी उपलब्ध झाले.

अशा प्रकारे बोरगव्हाण शाळेच्या विकासासाठी ग्रामपंचायत, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षणप्रेमी पालक, माजी विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन मोठा सहभाग दिला. त्यांच्या सहकार्यामुळे शाळेच्या भौतिक सुविधा सुधारल्या, शिक्षणाची गुणवत्ता उंचावली आणि विद्यार्थ्यांसाठी उत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. लोकसहभागातून झालेल्या या सकारात्मक बदलामुळे शाळा केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता समाजाच्या विकासाचे प्रतीक बनली. म्हणतात ना ''शाळेला गावाचा आधारा असावा, गावाला शाळेचा अभिमान असावा.''

**पृथ्वीराज धर्मे**
जि. प. आदर्श प्राथ. व माध्य. शाळा
बोरगव्हाण, ता. पाथरी जि. परभणी.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

# सृजनाच्या नव्या वाटा

यशस्वी जीवन जगण्याची शिक्षण हवे. शिक्षणामुळे सामाजिक, भावनिक, बौद्धिक विकास झाल्याशिवाय राहात नाही हेच ध्येय समोर ठेवून एका प्राथमिक शाळेने घेतलेली उंच भरारी उल्लेखनीय आहे. सावरगाव डुकरे येथील प्राथमिक शाळेचा झालेला कायापालट, शाळेला आयएसओ मानांकन मिळावे हा हेतू समोर ठेवून लोकसहभागाकडे शाळेने टाकले पहिले पाऊल. लोकसहभागाशिवाय पर्याय नव्हता. शाळेला येणारा निधी हा फार कमी होता, त्यामुळे कोणती नवीन गोष्ट त्यात साध्य होत नव्हती. सुरुवातीला निधी कसा जमवावा या प्रश्नाने प्रश्नांकित होऊन स्वतःपासून सुरुवात करावी असा वसा शिक्षकांनी घेतला. सुरुवातीला शिक्षक निधी सुमारे ३५ हजार रुपये जमा झाला. जमा झालेला निधी आवश्यक मूलभूत भौतिक सुविधांसाठी खर्च झाला. शाळेत काहीतरी नवीन घडायला लागले हे पाहून माजी विद्यार्थी, व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ प्रभावित झाले मग त्यांनी विकास कामांमध्ये खारीचा वाटा उचलण्यासाठी प्रतिसाद दिला. छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी ॲड. जीवन पाटील यांनी शाळेला लॅपटॉप, प्रिंटर यासारखी डिजिटल साधने त्यासोबतच शाळा खडूमुक्त करण्यासाठी प्रत्येक वर्गासाठी व्हाईट बोर्ड अशी सुमारे एक लाखाची भरघोस मदत केली.

शाळेत दुपारच्या सुट्टीत मुलांना नियमित पोषण आहार वाटप केला जातो त्यासाठी शासनाने विद्यार्थी संख्येप्रमाणे ताटे पुरवलेली आहेत, परंतु ही ताटे व्यवस्थित कोठे ठेवावी हा प्रश्न नेहमी पडायचा. ताटे एकावर एक ठेवली जायची त्यामुळे पाणी त्यातच राहून ताटांना गंज चढायचा. ताटे ठेवायला रॅक बनवायला शाळेकडे आर्थिक तरतूद नव्हती ही गोष्ट गावकऱ्यांच्या लक्षात आणून दिली. गावातील श्री. शनेश्वर संस्थेच्या सचिवांनी ही अडचण ओळखून पुढाकार घेतला. जवळजवळ २०० ताटे बसतील अशी लोखंडी मजबूत रॅक उपलब्ध करून दिली. प्रत्येक विद्यार्थ्याला दिलेला अनुक्रमांक रॅकवर तसेच ताटावर टाकण्यात आला. मधली सुट्टी होताच मुले आपल्या क्रमांकावर लावलेले ताट काढून स्वच्छ धुऊन घेतात व जेवण झाल्यावर ते ताट स्वच्छ धुऊन आपापल्या क्रमांकावर ठेवतात. या उपक्रमामुळे मुलांमध्ये स्वतःचे काम स्वतः करण्याची तसेच स्वच्छतेची आवड निर्माण झाली. शाळेचे थकलेले वीजबिल भरण्यासाठी उच्च पदावर कार्यरत असणाऱ्या शाळेच्या माजी विद्यार्थ्याने शाळेची ही गरज ओळखून शाळेचे वीजबिल भरण्यास मदत केली, तसेच आम्रपाली बचत गटाने शाळेच्या सुशोभीकरणाकरिता विविध प्रकारची रोपे रोपवाटीकेसाठी उपलब्ध करून दिली. एका ग्रामस्थांनी शाळेत उपस्थिती ध्वजस्तंभासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्याबरोबर एकांनी उपस्थिती ध्वज बांधकाम करून दिले तसेच त्यावर हिरवळीची लागवड करून शाळेची शोभा वाढवली.

शाळेतील विद्यार्थी आपले बूट व चप्पल वर्गाच्या बाहेर ठेवायचे. बूट व चप्पल व्हरंड्यामध्ये अस्ताव्यस्त पडलेले असायचे तसेच चिखलाने व्हरांडा भरून जायचा. विद्यार्थ्यांना बूट व चप्पल एका नियोजित ठिकाणी



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

शिस्तबद्ध पद्धतीने व्यवस्थित ठेवता यावी म्हणून १५० विद्यार्थ्यांचे बूट व चप्पल स्टॅन्ड तयार करण्याची संकल्पना आम्ही शाळा व्यवस्थापन समितीकडे मांडली त्यांनी लगेच ११ हजार रुपये निधी या उपक्रमासाठी उपलब्ध करून दिला. या रकमेतून शाळेचे चप्पल स्टॅन्ड या संकल्पित उपक्रमाचे स्वप्न पूर्ण झाले. चप्पल स्टॅण्डवर विद्यार्थी अनुक्रमांकाप्रमाणे आपले चप्पल व बूट ठेवतात. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, वक्तशीरपणा, स्वच्छता असे मूल्य सहजतेने रुजवता आले.

शाळेचा परिसर मोठा आहे; परंतु शाळेला मुख्य प्रवेशद्वार नव्हते या शाळेतील माजी शिक्षकांच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलाने शाळेचे प्रवेशद्वार व सुशोभीकरण शाळेच्या नावाचा फलक तयार करण्यासाठी ३४ हजार रुपये खर्च करून शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम व सुशोभीकरण करून दिले.

शाळेमध्ये अनेक कार्यक्रम साजरे होत असतात शाळेचे सभागृह व्यवस्थित नव्हते. या शाळेच्या माजी शिक्षक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलांनी शाळेच्या सभागृहासाठी ३१ हजार रुपये निधी उपलब्ध करून त्याचे सुशोभीकरण केले. त्यांच्या कवितांचे संग्रहचित्र सभागृहातील भिंतीवर लावण्यात आले आहे.

शाळेच्या पटांगणामध्ये विद्यार्थी खेळतात. त्यांचा खेळ काही विद्यार्थी उभे राहून पाहातात. काही कारणासाठी पालकसुद्धा शाळेत येतात त्यांनाही बसण्यासाठी व्यवस्था नव्हती. बसण्याची काहीतरी व्यवस्था करावी व मुलांना खेळाचा आनंद घेता यावा या उद्देशाने शाळेमध्ये बेंच अभियान राबविण्यात आले. गावातील सन्माननीय लोकांना आवाहन करण्यात आले. या योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला जवळजवळ २९ लोकांनी ५८ हजार रुपये किमतीचे बेंच शाळेला उपलब्ध करून दिले. त्या बेंचवर ज्यांनी तो बेंच दिला त्यांचे नाव लिहिले गेले. अशा प्रकारे मुलांची व पालकांची बसण्याची व्यवस्था झाली.

शाळेमध्ये विविध उपक्रम राबवले जातात या उपक्रमांसाठी अनेक अभिलेखे तयार करावे लागतात व हे अभिलेखे ठेवण्यासाठी एका ग्रामस्थांनी उपक्रम रजिस्टर ठेवण्यासाठी स्टॅन्ड दिले या स्टॅन्डची किंमत जवळजवळ ५ हजार रुपये होती अशा प्रकारे अभिलेखे आजही व्यवस्थित ठेवण्यात आलेले आहेत.

शाळेला शासनाकडून संगणक मिळाले आहेत, परंतु संगणक कक्षामध्ये इलेक्ट्रिक फिटिंग उपलब्ध नव्हती गावातील एक प्रतिष्ठित नागरिकाने शाळेतील संगणक कक्षाचे फिटिंग स्वतः अकरा हजार रुपये खर्च करून पूर्ण करून दिले.

शाळेतील सभागृहामध्ये विविध उपक्रम साजरे केले जातात. उपक्रम साजरे करत असताना पालकांना किंवा विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सतरंज्या नव्हत्या. गावातील पालकसभेत चटईसाठी प्रस्ताव मांडताच गावातील श्री. अंबादास डुकरे यांनी पाच हजार रुपयांचे सहकार्य केले.

शाळेला जुन्या काळातील पितळी घंटा होती. शाळेमध्ये शिपाई नाही. ही घंटा वाजवण्याचे काम शिक्षकांनाच करावे लागत होते. एक दिवस गावातील माजी शिक्षक शाळेत आले. त्यांनी शिक्षकांना घंटा वाजवताना बघितले. त्यांनी लगेच सर्व शिक्षकांना बोलावले यावर काही उपाययोजना करता येईल का असे



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III/26-07-2025/S

विचारले, आमच्या डोक्यामध्ये इलेक्ट्रिक बेल ही संकल्पना होती, लगेच आम्ही त्यांना सांगितले. त्यांनी आम्हाला पाच हजार रुपयांची इलेक्ट्रिक बेल दिली. आज रोजी शाळेचे कामकाज या बेलवर चालत आहे.

शाळेमध्ये 'वॉटर बेल' नावाचा एक उपक्रम आहे. विद्यार्थ्यांना प्रत्येक तासाला बेल वाजल्यानंतर नळावर जावे लागत होते. विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात होता. शरीराला भरपूर प्रमाणात पाणी आवश्यक आहे, यासाठी प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पाणी प्यावे हा या मागचा उद्‌देश होता; परंतु नळावर वेळ वाया जात होता. गावातीलच समाधान पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तसेच एक दानशूर व्यक्ती यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला पाण्याची बाटली उपलब्ध करून दिली. वॉटर बेल वाजल्यानंतर विद्यार्थी जागेवरच पाणी पितात त्यांचा वेळही वाचतो आणि तो वेळ अभ्यास आणि इतर उपक्रमांसाठी वापरला जातो.

आजपर्यंत जवळजवळ आठ ते दहा लाख रुपये गावातील लोकांनी शाळेच्या विकासासाठी दिलेले आहेत. शाळा आयएसओ झालेली आहे. शाळेचा विकास आपण लोकसहभागाच्या माध्यमातून करू शकतो.

**संध्या सौदर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जि. प. आदर्श प्राथ. शाळा

सावरगाव डुकरे, ता. चिखली जि. बुलढाणा.



Runa Graphics / 1 Com E/ 2024 / 13) Srujanarang_Ank 10 /2025/ Proof III /26-07-2025/S

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम







09:00